# धुळे येथे नाशिक विभागीय नैसर्गिक शेती व खरीप हंगामपूर्व कार्यशाळा उत्साहात पार पडली

धुळे येथे नाशिक विभागीय नैसर्गिक शेती व खरीप हंगामपूर्व कार्यशाळा उत्साहात पार पडली. तज्ञांच्या मार्गदर्शनासह ‘शेती शाळा’ उपक्रमातून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने ‘नैसर्गिक शेती व खरीप हंगामपूर्व कार्यशाळा’ हिरे भवन, स्टेशन रोड, धुळे येथे आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस नाशिक विभागातील शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आगामी खरीप हंगामासाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन घेतले.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. रफिक नायकवाडी, संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी त्यांनी नैसर्गिक शेती ही कमी खर्चात शाश्वत उत्पादन देणारी पद्धत असल्याचे सांगितले. जमिनीची सुपीकता वाढविणे, पाण्याची बचत करणे व रासायनिक अवलंबित्व कमी करणे यासाठी नैसर्गिक शेती अत्यंत उपयुक्त असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून निव्वळ नफा वाढविण्यासाठी नैसर्गिक शेतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या कार्यक्रमास मा. डॉ. गोरख ससाणे, संचालक (विस्तार शिक्षण), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी तसेच मा. डॉ. बबनराव इर्ले, सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, धुळे यांनी विशेष उपस्थिती लावून शेतकरी व अधिकारी वर्गाला मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुभाष काटकर, विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक हे होते. त्यांनी विभागात राबविण्यात येणाऱ्या ४७५ ‘नैसर्गिक शेती शाळा’ उपक्रमाचे सविस्तर नियोजन मांडले. या उपक्रमातून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतपातळीवर प्रशिक्षण देऊन स्थानिक संसाधनांवर आधारित शेती पद्धती विकसित करण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. नैसर्गिक शेतीमुळे मातीतील सूक्ष्मजीव वाढ, जमिनीची धारण क्षमता सुधारणा व दीर्घकालीन उत्पादन क्षमतेत वाढ होते, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यशाळेत विविध पिकांवर आधारित तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. नैसर्गिक शेती विषयावर डॉ. उल्लास सूर्ये यांनी सविस्तर मार्गदर्शन करताना जीवामृत, घनजीवामृत, बीजामृत यांच्या वापरामुळे मातीची गुणवत्ता सुधारते व पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते असे सांगितले. मका पिकासाठी डॉ. विवेक शिंदे, सोयाबीन पिकासाठी डॉ. जगदीश काथेपुरी तसेच कांदा पिकासाठी डॉ. दिनेश नांद्रे यांनी आधुनिक व कमी खर्चिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. खरीप हंगामातील कीड व रोग व्यवस्थापनासाठी नैसर्गिक उपाययोजना प्रभावी ठरतात, असे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील यांनी सांगितले.

कार्यशाळेतील विशेष आकर्षण म्हणून दुपारच्या सत्रात ‘हँड्स ऑन ट्रेनिंग’ (प्रत्यक्ष प्रात्यक्षिक) व ‘शेती शाळा’ नाटिका सादर करण्यात आली. या माध्यमातून शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीतील तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहता व समजता आले. श्री. दिनेश पाटील यांनी ‘पीकनिहाय शेती शाळा’ उपक्रमाचे नियोजन सादर केले.

यावेळी नाशिक, जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांच्या अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी खरीप हंगामपूर्व नियोजन सादर केले. या प्रसंगी मा. श्री. रविंद्र माने, मा. श्री. कुरबान तडवी, मा. श्री. दीपक पाटील व मा. श्री. अभिमन्यु काशीद तसेच कृषी विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक मा. श्री. दिनेश नांदे उपस्थित होते. तसेच ४७५ शेतीशाळांचे आयोजक, प्रगत शेतकरी व समन्वयक मिळून सुमारे १५०० अधिकारी व शेतकरी कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धुळे श्री. सुरज जगताप यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. शेवटी मुक्त चर्चासत्राद्वारे शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान करून कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

